जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे होत असलेल्या अवैध गर्भपात प्रकरणाची चौकशी करण्याकरीता समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रचिनी-२०१९/१८३/प्र.क्र.४३/कु.क.

बी विंग, १० मजला, गो.ते.रुग्णालय, संकुल इमारत
लो.टि.मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: २९ ऑगस्ट,२०१९

प्रस्तावना –

जिल्हा रुग्णालय नाशिक येथील अवैध गर्भपात प्रकरणाबाबत दि.२.४.२०१७ रोजीच्या वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने मा.मंत्री महोदय (सार्वजनिक आरोग्य) यांनी विधीमंडळात निवेदन केले होते. शासकिय रुग्णालयात घडणाऱ्या बेकायदेशीर गर्भपाताच्या घटनांच्या पाश्वभूमीवर वैद्यकिय गर्भपात कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता मा. मंत्री महोदय (सार्वजनिक आरोग्य विभाग) यांनी सेवानिवृत्त पोलिस महासंचालक आणि सेवा निवृत्त आरोग्य संचालक यांच्यामार्फत चौकशी करण्याचे आश्वासन दि. ७.४.२०१७ रोजी विधीमंडळात दिले आहे.

अनुषंगाने जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे होत असलेल्या अवैध गर्भपाताच्या घटनांची चौकशी करण्याकरीता भारतीय पोलिस सेवेतील (IPS) दर्जाच्या सेवानिवृत्त पोलिस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे होत असलेल्या अवैध गर्भपात प्रकरणाची चौकशी करण्याकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	सदस्याचे नाव	पदनाम	सदस्यत्वाचा प्रकार
१	श्री. दत्ता पडसलगीकर	सेवानिवृत्त पोलिस महासंचालक	अध्यक्ष
२.	डॉ. प्रकाश डोके	सेवानिवृत्त संचालक आरोग्य सेवा	सदस्य
३.	प्राध्यापक व विभाग प्रमुख स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र विभाग, ग्रॅन्ट शासकिय महाविद्यालय व सर जे.जे. रुग्णालय, मुंबई	स्त्रीरोगतज्ञ	सदस्य
४	सहाय्यक संचालक आरोग्य सेवा	सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे	सदस्य सचिव

समितीची कार्यकक्षा-

१. जिल्हा रुग्णालय, नाशिक या शासकिय रुग्णालयामध्ये अवैध गर्भपाताची घटना घडलेली आहे. त्या घटनांची चौकशी करुन अभिप्राय व अहवाल शासनास सादर करणे.
२. अशा प्रकारे घडण्याऱ्या घटनांसाठी कारणीभुत शासकीय यंत्रणेमधील त्रुटी शोधणे.
३. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सुचविणे.

समितीचा कार्यकाल-

सदर समिती घटना घडल्याच्या दिनांकापासुन १ महिन्याच्या कालावधीमध्ये आपला चौकशी अहवाल शासनास सादर करेल. समितीने विहित वेळेत अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.

मानधन-

समिती सदस्यांना कामकाजासाठी दैनिक भत्ता, भाडयाचे वाहन, राहण्याची व्यवस्था अनुज्ञेय राहील. सोनोग्राफी केंद्राच्या नोंदणीमुळे राज्यस्तरावर जमा झालेल्या शुल्कामधुन हा खर्च सामाजिक लेखापरिक्षणासाठीचा येणारा खर्च याबाबीसाठी करण्यात यावा. शासन निर्णय दि.३०.५.२०१७ नुसार हा खर्च करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२९१३१३०४५७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2019.08.29 13:37:12 +05'30'

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, राज्यपाल कार्यालय, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई.
१०.आयुक्त , आरोग्य सेवा व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
११.व्यवस्थापक मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय, मुंबई
१२.विभागीय जनसंपर्क अधिकारी माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
१३.सर्व मंत्रालयीन विभाग,
१४.निवडनस्ती.